# मेट्रो-३ चा २२ किमी भुयारी मार्ग पूर्ण!

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या भूगर्भात चालविण्यात येणाऱ्या मेट्रो ३ च्या तब्बल २२ किमीच्या मार्गाचे खोदकाम पूर्ण झाले आहे. मुळातच समुद्रावर वसलेल्या मुंबईत जमिनीच्या खाली पाणीच पाणी आणि त्यातच भूकंपप्रवण क्षेत्र अशा प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीत मुंबईकरांची फारशी गैरसोय न होता झालेल्या या कामाबद्दल मोठी उत्सुकता आहे. परदेशातून आणलेल्या १७ टीबीएमच्या (टनेल बोरिंग मशिन) मार्फत हे काम सुरू आहे.

मुंबई मेट्रो-३ ही मार्गिका कुलाबा-वांद्रे-सीप्झ यांना जोडणारी असून ती पूर्णतः भुयारी आहे. नोव्हेंबर २०१७ पासून भुयारी मार्गाच्या कामाला सुरुवात झाली होती. आतापर्यंत वेगवेगळ्या ९ ठिकाणी जमिनीच्या भूगर्भात शिरलेली ही टीबीएम आपले लक्ष्य पूर्ण करून बाहेर पडत आहेत. गुरुवारी गोदावरी ३ टीबीएमने बीकेसीपासून विद्यानगरीपर्यंतचा मार्ग पूर्ण केला. गोदावरी टीबीएमने ८९० मीटर लांब मार्ग १८५ दिवसांत तयार केला आहे. तब्बल ८३ मीटर लांब असलेल्या मशीनमार्फत रोज ४.९ मीटर खोदकाम केले जात आहे.

## मेट्रो-३ कुलाबा-वांद्रे-सिप्झ : स्थानके २७




### मेट्रो-३ झाल्यानंतर

- १७ लाख मुंबईकर रोज मेट्रोने प्रवास करतील.
- ४,५६,७७१ वाहनांच्या खेपा रस्त्यांवरून कमी होतील.
- २.५ लाख लिटर इंधनाची बचत होईल.
- ५५० कोटी रुपयांची बचत होईल.

- चर्चगेट, छत्रपती शिवाजी टर्मिनस, मुंबई सेंट्रल व महालक्ष्मी येथे प्रवाशांना उपनगरीय रेल्वेमार्गावरील गाड्यांची अदलाबदल करता येईल. मरोळ नाका येथे मेट्रो वनशी हा मार्ग जोडला जाणार आहे.
- सर्व स्थानके ही अत्याधुनिक तंत्रज्ञानाने विकसित असणार आहेत. भुयारी स्थानके असल्यामुळे तेथील वायुवीजन व वातानुकूलन प्रणाली अत्याधुनिक असणार आहे.
- स्थानकांवर सरकते जिने, उद्वाहक, सुरक्षित फलाट, रेल्वेचे बंद दरवाजे, सीसीटीव्ही देखरेख, यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला, रुग्ण यांना वाढीव सुरक्षा मिळेल.

- **मुंबई विमानतळापासून, शिवसेना भवन स्टेशनपर्यंत दोन्ही बाजूने खोदकाम पूर्ण झाले आहे. वरळी, सिप्झ, सहार, एमआयडीसी आणि विद्यानगरी स्टेशनपर्यंत केवळ एका बाजूने खोदकाम पूर्ण झाले आहे. या मार्गात आतापर्यंत ३२ ठिकाणी भुयारी मार्ग करून टीबीएम बाहेर आले आहे. ९ भुयारी मेट्रो स्टेशनची खोदकाम पूर्ण झाले आहे.**